माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : १०७२/२०१८**

**तक्रारकर्ता,** ॲड बाबूलाल दशरथ मेश्राम,
प्लॉट नं. ३९७, कुकडे लेआऊट, नागपूर-४४००२७.

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा अ. का., नागरी जमीन कमाल धारणा,**
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा नागरी जमीन कमाल धारणा,**
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २२.१२.२०२१**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | : | अनुपस्थित |
| **जन माहिती अधिकारी** | : | उपस्थित |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | उपस्थित |

| **द्वितीय अपील आदेशाचा दिनांक** | **आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक** | **मूळ तक्रार अर्जाचा दिनांक** |
|---|---|---|
| २४.०९.२०१८ | -- | १५.१२.२०१८ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. २१५४/२०१८, दिनांक २४.०९.२०१८ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर आज दिनांक २२.१२.२०२१ रोजी सुनावणी घेण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, श्री. व्हि. एस. अवझे व प्रथम अपीलीय अधिकारी तहसिलदार (नझूल), श्रीमती सिमा गजभिये उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता, श्री. ॲड बाबूलाल दशरथ मेश्राम यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. २१५४/२०१८ अन्वये आयोगाने दिनांक २४.०९.२०१८ रोजी सुनावणी घेवून " जन माहिती अधिकारी तसेच सहायक जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम ७(१) चा भंग केला असे प्रथमदर्शनी

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

निदर्शनास येत असल्याने त्यांना कलम १९(८)(ग) व २०(१) नुसार शास्ती का लादण्यात येवू नये, याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्तीपासून १५ दिवसाचे आत आयोगास सादर करावा. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपीलीय अर्जावर सुनावणी घेतलेली नसल्याचे निदर्शनास येत असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(६) चा भंग केलेला आहे. त्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन दिनांक १० जून, २००८ रोजीचे परिपत्रक व कलम १९(८)(ग) व २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस का करण्यात येवू नये? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्तीपासून १५ दिवसाचे आत आयोगास सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ७ दिवसात अपीलार्थीस माहिती अर्जात नमुद असलेली माहिती कलम ७(६) नुसार विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी" असे आदेशीत करुन प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले होते.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक १५.१२.२०१८ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले की, तक्रारकर्ता, श्री. ॲड बाबूलाल दशरथ मेश्राम यांनी दाखल केलेल्या अपील क्र. २१५४/२०१८, आदेश पारीत दिनांक २४.०९.२०१८ अन्वये आयोगात यापुर्वी तक्रार क्र. ६५/२०१९, २५५/२०१९ व ३००/२०१९ दाखल केला आहे. त्यावर दिनांक २१.०८.२०२० रोजी ऑनलाईन सुनावणी घेवून तत्कालीन मा. आयुक्त यांनी आदेश पारीत करुन सदर तक्रार अर्ज निकाली काढल्याचे दिसून येते. तसेच सदर आदेश दिनांक २३.०९.२०२० रोजी निर्गमित केल्याचे आढळून येते. ही बाब लक्षात घेता, एकाच द्वितीय अपीलाच्या अनुषंगाने वारंवार तक्रार अर्ज सादर करुन त्यावर फेरसुनावणी घेणे अपेक्षीत नाही. सबब तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक** **२२.१२.२०२१**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नागपूर**

जा.क्र.128 दि. 14 JAN 2022

Desktop/K-S/ complaint/1072/2018